
# 6 भाज्यांचा मळा





रूमी आणि शमी एकमेकांना शेतातून भाजी काढायला मदत करत आहेत। प्रत्येकाकडे एकएक टोपली आहे आणि ते भाज्या काढून टोपल्यांमध्ये ठेवत आहेत। बघू या, दोघांनी किती भाज्या काढल्या।

अ.



रूमीची टोपली शमीची टोपली दोघांकडे आहेत

7 टोमॅटो आणि 5 टोमॅटो मिळून 12 टोमॅटो होतात।

7 + 5 = ______


ब.



एका टोपलीत 9 गाजरे आणि दुसऱ्या टोपलीत 4 गाजरे आहेत।

9 + 4 = ______

क.



एका टोपलीत 8 मुळे आणि दुसऱ्या टोपलीत 8 मुळे आहेत।

8 + 8 = ______



## प्रकल्प कार्य

तुमच्या घरी, शाळेत किंवा जवळपासच्या ठिकाणी कोणत्याही भाज्यांची रोपे लावा। तुमचे अनुभव तुमच्या मित्रांना आणि कुटुंबियांना सांगा आणि रोपांची काळजी घ्या। तुम्ही कागदावर वाढत्या रोपाची चित्रे काढू किंवा लावू शकता।

© NCERT not to be republished

# मणी आणि माळा

## चला खेळू या









© NCERT not to be republished

## हे अंक तुम्ही मोजमणी माळेवर कसे मोजू शकता ते दाखवा?


13 + 4 =





14 + 5 =



6 + 8 =



5 + 7 =



## उडी मारा आणि बेरीज करा

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

8 + 5 = 13   5 + 3 = 8

13 + 3 = ☐   ☐ + ☐ = 13

2 + 16 = ☐   ☐ + ☐ = 10

4 + 12 = ☐   ☐ + ☐ = 18

## तुमच्या पद्धतीने बेरीज करा

अ. सपनाकडे 12 रंगीत पेन्सिली  आहेत आणि गौरीकडे 6 रंगीत पेन्सिली  आहेत। त्यांच्याकडे एकूण किती पेन्सिली आहे




सपनाने 12 च्या पुढे 6 अधिक
मोजले आणि 18 झाले।

12 + 6 = 18

बेरजेच्या पद्धतीबद्दल चर्चा करा। मुले 12 कशी मोजतात आणि नंतर त्यात 4 कशी मिळवतात? ते वापरत असलेल्या पद्धतींची चर्चा करा।



© NCERT not to be republished

गौरीने हे अशाप्रकारे सोडवले—

$12 + 6$

$10 + 2 + 6$

$10 + 8 = 18$

तुम्ही हे काही वेगळ्या पद्धतीने सोडवू शकता का? प्रयत्न करा आणि तुमच्या शिक्षकांशी चर्चा करून पहा।




ब. अमनकडे 8 लाडू आहेत आणि चरणजीतने 6 लाडू आणले। दोघांकडे मिळून एकूण किती लाडू झाले? ☐



क. शीनाकडे 12 बांगड्या आहेत। तिला तिच्या बहिणीकडून आणखी 6 बांगड्या मिळाल्या। आता तिच्याकडे एकूण किती बांगड्या आहेत? ☐




## चला करू या

तुम्हाला सहलीला जाताना काय घेऊन जायला आवडेल? तुमच्या मित्राशी चर्चा करा। चर्चेनंतरतुम्हाला सहलीला न्यायला आवडणाऱ्या वस्तूंची चित्रे खाली दिलेल्या जागेत काढा आणि त्यामधील खाण्यायोग्य वस्तूंची संख्या लिहा।





© NCERT not to be republished

# वजाबाकी

आणखी काही संख्यांची वजाबाकी करा आणि लिहा।




15 – 9 = 6

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | <br>16 – 4 = | 2. | <br>12 – 5 = |
| 3. | <br>14 – 7 = | 4. | <br>16 – 6 = |
| 5. | 15 – 5 = | 6. | 15 – 0 = |
| 7. | 17 – 9 = | 8. | 13 – 3 = |

© NCERT not to be republished

## पुढे उडी मारा, मागे उडी मारा

अंजली आणि रेणू उड्या मारत खेळत आहेत।






### चला करू या

खेळाच्या मैदानात किंवा घरी एक संख्यापट्टी बनवा आणि एकाच ठिकाणी पोहोचण्याचे वेगवेगळे मार्ग शोधा।

### बेरीज, वजाबाकी आणि जोड्या लावा

| | | |
|---|---|---|
| 8 + 7 | 12 | 15 – 3 |
| 9 + 9 | 15 | 18 – 1 |
| 10 + 2 | 14 | 17 – 2 |
| 16 + 1 | 17 | 18 – 0 |
| 11 + 3 | 18 | 16 – 2 |

यांसारखे अजून प्रश्न तयार करून मुलांना विचारा। प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी ते सोडवण्याच्या मार्गांवर चर्चा करा। हे प्रश्न सोडवण्यासाठी मुलांना त्यांची स्वत:ची पद्धती सांगू द्या।



© NCERT not to be republished

## तुमची उत्तरे चौकटीत लिहा।

अ. एका कुंभाराकडे 9 दिवे होते। त्याने 5 दिवे विकले। त्यानंतर त्याने आणखी 7 दिवे बनवले। त्याच्याकडे आता एकूण किती दिवे आहेत? [ ]



ब. पहिल्या थांब्यावर 6 मुले बसमध्ये चढली। दुसऱ्या थांब्यावर आणखी 8 मुले बसमध्ये चढली। तिसऱ्या थांब्यावर 7 मुले बसमधून उतरली। आता बसमध्ये एकूण किती मुले आहेत? [ ]




क. बसमध्ये एकूण 18 जागा आहेत। तिथे 9 मुले आधीच बसली असतील तर बसमध्ये आणखी किती मुले बसू शकतात? [ ]

ड. कुलजीतने तिच्या डब्यात 14 टॉफी आणल्या आहेत। तिने तिच्या मित्रमैत्रिणींना काही टॉफी वाटल्यावर तिच्याकडे 6 टॉफी उरल्या होत्या। तिने तिच्या मित्रमैत्रिणींना किती टॉफी वाटल्या? [ ]

इ. रमणने 12 केळी विकत घेतली आणि त्यांतील काही केळी खाल्ली। त्याच्याकडे 5 केळी शिल्लक राहिली। त्याने किती केळी खाल्ली? [ ]

© NCERT not to be republished